# जाहिरातीचा नमुना

## वैद्यकिय अधिक्षिका, जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला

## सॅनेटरी वेंडीग मशीनचे दरपत्रक मागविणेबाबत

सॅनेटरी वेंडीग मशीन जिल्हा स्त्री रुग्णलय अकोला येथे उपलब्ध आहे. सदर सॅनेटरी वेंडिग मशीनद्वारे सॅनेटरी पॅडचा उपयोग गरजु महिलांना नियमित उपलब्ध व्हावा याकरिता बसविण्यात आलेली आहे. तरी रुग्ण कल्याण समिती जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला येथील नियामक समितीमध्ये घेतलेल्या नियमानुसार नोंदणीकृत महिला बचतगटाकडुन सदर वेंडीग मशिनमध्ये सॅनेटरी पॅडचे रिफीलिंग करुन दयावयाचे आहे. तरी MOU करिता इच्छुक नोंदणीकृत महिला बचत गट किंवा संस्था यांनी त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र व संमतिपत्र संस्थेच्या लेटरहेडवर ७ दिवसाच्या आत जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला या कार्यालयास सादर करावे. सदर मशीनमध्ये सॅनेटरी पॅडचा नियमित साठा उपलब्ध राहील यांची जबाबदारी ही निवड झालेल्या संस्थेची राहील. सॅनेटरी वेंडीग मशीनमध्ये उपलब्ध पॅड संपल्यानंतर संबंधित संस्थेला पुन्हा सॅनेटरी पॅड टाकावे लागेल व वेंडर मशीनमध्ये जमा झालेले शुल्क संबंधित संस्थेने ताब्यात घ्यावे जेणेकरुन वेंडर मशीनमध्ये नियमित पॅड उपलब्ध राहतील. रु ५ चे नाणे त्या संयंत्रामध्ये टाकण्याचे तांत्रिक दृष्टया निश्चित झालेले आहे. सदर मशिनची देखभाल व दुरुस्ती निवड झालेल्या संस्थेची राहील. निवड झालेल्या संस्थेला सॅनेटरी पॅडचा नियमित पुरवठा करावा लागेल. सदर MOU हा पुढील १ वर्षाकरिता वा सेवा समाधानकारक असेपर्यंत हयापैकी जे आधी धडेल तोपर्यंत करार सुरु राहील. एका पेक्षा जास्त संस्थेचे अर्ज प्राप्त झाल्यास संस्थेची निवड ही जिल्हा स्त्री रुग्णालय येथील खरेदी समीती इश्वर चिठठी द्वारे निवड करील. सेवा स्विकारणे/नाकारणे कार्यालय प्रमखाने राखुन ठेवले आहे.

**(डॉ आरती कुलवाल)**
**वैद्यकिय अधिक्षिका**
**जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला**